जु१६८१
१६।०८।२४

ठाणे माहानगरपालिका,ठाणे
शिळ अग्निशमन केंद्र
ठा.म.पा./शिळ अ.केंद्र/जा.क्र:- ११२।१
दिनांक:-१८/०७/२०२४

साठा परवाना नूतनीकरण

सादर,

मेसर्स:- भारत गीअर्स लि.

विषय:- अग्निशमन विभागाकडील ना-हरकत दाखला मिळणेबाबत

संदर्भ:- १) अर्जदार श्री.ओ.पी.मराठे यांचा दिनांक:-०६/०६/२०२४ रोजीचा अर्ज.

२) अग्निशमन केंद्र अधिकारी श्री.पी.डी.पाटील यांनी दिनांक:- २५/०६/२०२४ रोजी केलेली तपासणी.

३) मे.फायर सोल्युशन यांच्याकडील MFS-LA/RF-274 , MFS-LA/RD-271 दिनांक:-२५/०१/२०२४ रोजीचा फॉर्म बी सादर केला आहे.

सादर,

सर्वे नं १३९/१अ, १३९/२अ, १३९/२ब, १३८/१, शिळ गाव, सर्वे नं ९७/२, ९८, ९९/१, ९९/२, ९९/३/ब, १००/१, १०१/५/ब, कौसा मुंब्रा याठीकाणी भारत गीअर्स कंपनी ३२ एकर.जागे मध्ये अस्तीत्वात असुन २८,५७२.६५ स्क्वे.मि.जागेचा कंपनी वापर करते व ऊर्वरीत जागा मोकळी आहे काही भागात आर.सी.सी. व काही भागात पत्र्याचे बांधकामात करण्यात आले आहे. सदर कंपनी मध्ये वाहनांच्या स्टीलचे गीअर्स बनवण्याचा व्यावसाय करण्याकरीता परवाना विभागाकडुन अग्निशमन विभागाकडे ना-हरकत दाखला मिळवण्याबाबत अर्जदार श्री.ओ.पी.मराठे यांचा दि.०६/०६/२०२४ रोजीचा अर्ज

त्यानुसार उपरोक्त जागेची आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनेच्या दृष्टीकोनातुन दि.२५/०६/२०२४ रोजी अग्निशमन केंद्र अधिकारी श्री पी.डी.पाटील यांनी तपासणी केली असता खालील गोष्टी निदर्शनास आल्या आहेत .

१. भारत गियर्स कंपनी ३२ एकर जागेत आहे व त्यापैकी २८,५७२.६५ स्क्वे.फुट जागेचा वापर कंपनी करते व बाकी उर्वरीत जागा मोकली आहे.
२. सदर कंपनि सन १९७२ ला चालु केली त्यावेळी कंपनिचे दोन प्लॅन्ट चालु होते त्याकरता कंपनिने ७३००० लिटर पेट्रोलियम पदार्थ १५००० लिटर कटींग ऑईल व १६०० चौ.फु. वुडन बॉक्स ठेवण्याचा प्रयोजन केला होता. परंतु अत्ता कंपनिचा फक्त एकच प्लॅन्ट चालु असल्यामुळे कंपनित पेट्रोलियम प्रोडक्ट ऐवजी एल.पी.जी.गॅस चा वापर केला जातो तसेच कटिंग ऑईल फक्त ५००० लि वापरला जातो व लाकडी बॉक्स १५ कि.ग्रा. चे ८०० नग म्हणजे १२००० कि.ग्रा. वापरले जातात असे तपासणी वेळी निदर्शनास आले तसे कंपनिचे एच.आर मॅनेजर श्री ओ.पी.मराठे यांनी सांगीतले.
३. सदर कंपनी हि रस्त्यालगत असुन फायर वाहन जाण्यास पुरेशी मोकळी जागा आहे.
४. सदर भारत गियर्स कंपनीत व्हेइकल ऑटोमोबाईल गियर्स मॅन्युफॅक्चरिंग करण्याचा व्यवसाय केला जातो व विक्री केली जाते.

५. अंदाजे १३००० चौ.मी, जागे मध्ये स्टिल गीअर कंटींग करण्याचे काम केले जाते व त्यासाठी ५००० ली कंटींग ऑईल चा उपयोग केला जातो व त्या ऑईलचा फ्लॅश पॉईट एकदम जास्त असल्यामुळे त्यांच्या सुरक्षेसाठी ट्रॉली माउंटेड ५०कि.ग्रा चे तिन फोम टाईप फायर एक्स्टींग्युशर ठेवलेले आहेत. कंपनीच्या सर्वर रुम साठी सी.ओ.२ फ्लडींग सिस्टीम बसवण्यात आली आहे.

६. अंदाजे १६०० चौ.मी. मध्ये गीअर पॅकींग करीता रेडीमेड लाकडाचे बॉक्स मागवुन पॅकींग केली जाते प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर लाकडाचे बॉक्स १५ कि.ग्रा. चे ८०० बॉक्स असे एकूण १२००० कि.ग्रा. होते

७. सदर कंपनीच्या मागील बाजुस अंदाजे १४०० चौ.मी मध्ये मोकळ्या जागेत एल.पी.जी. गॅस चे १० टनाचे २ टॅक आहेत व त्या दोन्ही टॅकची कॅपेसिटी १९९७६ ली. ईतकी आहे तसेच प्रोपेन गॅसचे १० टनाचे २ टॅक आहेत व त्याही दोन्ही टॅक ची कॅपेसिटी १९९७६ ली इतकी आहे परंतु सदर कंपनीत प्रोपेनचा अत्ता वापर करत नसल्यामुळे त्या टॅक मध्ये सुध्दा एल.पी.जी चा तेव्हाढाच साठा केला जातो.

८. कंपनिच्या मागील बाजुस डिझेल चे १००००लि. चे २ टॅक आहेत व सुरक्षेसाठी ०३ फोम एक्स्टींग्युशर ट्रॉली माउंटेड ५० कि.ग्रा. चे ठेवण्यास सांगीतले आहेत तसेच डिझेलचा वापर जनरेटर करता केला जातो. तसेच सदर ठिकाणी एक हायड्रंट बसवण्याचे सुचवले आहे व फोम चे डब्बे ठेवण्यास सुचवले आहे.

९. अंदाजे ३०० कि.ग्रा कॉटन वेस्ट साठा करून ठेवण्यात आला होता.

१०. सदर कंपनीत आग प्रतिबंधक उपाययोजना म्हणून ठिक-ठिकाणी फायर एक्स्टींग्युशर, ट्रॉली माउंटेड फोम एक्स्टींग्युशर, एफ.एम २०० सी.ओ.२ फ्लडींग सिस्टीम, ठेवण्यात आलेले आहेत.

११. प्रस्तावित **भारत गीअर्स कंपनी लि.**या कंपनीमध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाय-योजना बसविण्यात आली आहे व मे. फायर सोल्युशन यांचेकडील लायसंन्स क्र.MFS-LA/RF-330 , MFS-LA/RD-311 यांचे कडील दिनांक:-१७/०६/२०२४ रोजीचा फॉर्म ची सादर केला आहे.

वरील नमुद केलेल्या बाबीचा एकंदर परिस्थिती पाहता भारत गीअर लि. कौसा मुंब्रा याठीकाणी भारत गीअर कंपनी.येथे वेहिकल ऑटोमोबाईल गियर्स मॅन्युफॅक्चरिंग करीता अग्निशमन विभागाच्या अटी व शर्तींवर ना-हरकत दाखला देण्यास अग्निशमन विभागाची शिफारस आहे .

मे.स.कळावे

18/07/2024

अग्निशमन केंद्र अधिकारी

शिळ अग्निशमन केंद्र

मा.विभागीय अधिकारी सो.

यांच्या मार्फत रवाना.